# रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज

SERVE TO CHANGE LIVES


डिस्ट्रिक्ट ३१३१

संपादक :
रो. प्रमोद गुगळे
कमिटी सभासद
रो. विनय वाघ
रो. जयंत कुलकर्णी

प्रांतपाल २०२१-२०२२
रो. पंकज शहा
अध्यक्ष : रो. विनायक पेठे
सचिव : रो. हर्षदा बावनकर

अंक दुसरा, ऑगस्ट २०२१


## Presidential



नमस्कार मित्रहो,

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

वर्षाची सुरुवात वृक्षारोपण करून झाली, खूप सुंदर असा प्रतिसाद क्लब मधील सदस्यांकडून मिळाला. त्याचबरोबर १ जुलै हा दिवस डॉक्टर्स डे व सीए डे म्हणून सेलिब्रेट केला जातो. आपण देखील ३५ डॉक्टर्स व १५ सीए ह्यांना पीआय टीम व व्होकेशनल टीम ह्यांचेतर्फे फेलिसीटेट केले.

सर्व्हीस प्रोजेक्ट टीमतर्फे वेल्हे येथील ग्रामीण भागातील शाळांमधील विध्यार्थ्यांना पावसाळ्यात येणे जाणे सुकर व्हावे म्हणून रेनकोट देण्याचा प्रोजेक्ट केला गेला. अवघ्या १२ तासात ११४ रेनकोट चे पैसे उभे राहिले व एक सुंदर व गरजेचा प्रोजेक्ट करण्यात आला. मित्रांनो रेनकोट मिळाल्यानंतर मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य आपल्या सर्वांना खूप समाधान देऊन गेले.

भारत विकास परिषद यांचे बरोबर जेजुरी येथे जयपूर फूट प्रोजेक्ट साठी योग्य लाभार्थी शोधण्यासाठी शिबिर घेण्यात आले. ११३ दिव्यांग व्यक्तींना आपण कृत्रिम हात , पाय ह्या उपक्रमाअंतर्गत देणार आहोत. मित्रहो, हा प्रोजेक्ट देखील खूप उपयुक्त असा प्रोजेक्ट आहे, ह्या व्यक्तींना स्वबळावर उभे करण्यासाठी ह्याची खूपच मदत आहे. आपण ह्यात भविष्यात भारत विकास परिषद यांच्याबरोबर अजून काम करणार आहोत.

वर्षाची सुरुवात करताना मी सांगितले होते आपला सर्व भर इम्पॅक्ट मेकिंग प्रोजेक्ट करण्यावर राहणार आहे. आणि पहिल्या दोन महिन्यात आपण तसेच प्रोजेक्ट केले आहेत.

आपण ह्या वर्षी ससून हॉस्पिटल मधील बालरुग्ण विभागात ऑपरेशन थिएटरमध्ये लागणारे अत्याधुनिक लॅप्रोस्कोपी युनिट ग्लोबल ग्रांट प्रोजेक्ट अंतर्गत उभे करत आहोत. त्यासाठीची सर्व तयारी आपल्या टीमतर्फे सुरू झाली आहे. विशेष म्हणजे आपल्याला फॉरेन पार्टनर देखील मिळाला आहे. आता अजून एक पार्टनर मिळविण्यासाठी प्रयत्न चालू आहे. अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्याला ह्या प्रोजेक्टला मद्रास हेरिटेज क्लब ५००० यु एस डॉलर्स देत आहे. खूप विलक्षण अशी ही गोष्ट आहे, हेरिटेज क्लबच्या शोधात आपली मद्रास क्लब तर्फे ओळख होते काय, आपल्या इंस्टॉलेशनला त्यांचे प्रेसिडेंट उपस्थित राहतात काय आणि एवढी मदत जाहीर करतात काय, हे सर्व रोटरी मुळेच शक्य होते.

आपले सन्माननीय सदस्य विनोदजी जाधव यांनी दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षी देखील २० ते २५ लाख रुपये आपल्या विविध प्रोजेक्टसाठी देण्याचे आश्वासन दिले आहे. ज्यात ग्लोबल ग्रांट प्रोजेक्ट, जयपूर फूट प्रोजेक्ट, कोकणातील अतिवृष्टीमुळे आलेल्या पुराने बाधित झालेल्या जिल्हापरिषद शाळांमधून दुरुस्ती करण्यात येणार आहे.

ह्याचबरोबर आपण भिवरी, ता. पुरंदर येथील कानिफनाथ विद्यालय ह्या शाळेत रसायनशास्त्र वैज्ञानिक प्रयोगशाळेत ओटे बांधून देणार आहोत. तसेच त्यासाठी लागणारे काही साहित्य देखील देणार आहोत. पठारवाडी येथील पूर्वप्राथमिक शाळेला कंपाउंड वॉल बांधून देण्याचा प्रोजेक्ट पुढील महिन्यात सुरू होईल.

At NMV girl's school and kanifnath school at Bhivri, our youth team is going to start interact clubs.

पहिल्या दोन महिन्यात आपल्या प्रोग्रॅम टीम, फेल्वरल टीमने उत्तम मीटिंग केल्या आहेत. वेगवेगळे विषय घेण्यात आले आहेत. असेच वर्षभर कार्यक्रम चालू राहतीलच. डॉक्टर तुमच्या भेटीला या कार्यक्रमाच्या अंतर्गत ३ वेगवेगळ्या विषयांवर कार्यक्रम झाले आणि या कार्यक्रमांना उत्तम प्रतिसाद मिळालेला आहे. ह्यामुळे आपला P.I. खूप चांगला होतोय आणि नवीन माणसे जोडली जात आहेत.

आता पुढील महिन्यात आपण २० सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर ह्या पितृपक्षातील कालावधीत आपला सिग्नेचर प्रोजेक्ट महादान करत आहोत. डायरेक्टर सचिन व सिग्नेचर प्रोजेक्ट चेअरमन मधुमिताच्या टीमची त्यादृष्टीने तयारी सुरू झाली आहे. जास्तीत जास्त सोसायट्यांपर्यंत आपण पोहचण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. दरवर्षीप्रमाणे ह्या प्रोजेक्टला सर्व क्लब सदस्यांची मदत लागणार आहे तेव्हा सर्वजण मिळून ह्या वर्षीचे महादान यशस्वी करूयाच.

धन्यवाद!
विनायक पेठे,
अध्यक्ष





# संपादकीय

न त्वहम् कामये राज्यम् । न स्वर्गम् नापुनर्भवम् । कामये दुःखतप्तानां । प्राणिनाम् आर्तीनाशनम् ।।

मला राज्य उपभोगायची इच्छा नाही, स्वर्ग आणि मोक्ष भावनाही मला नाही, माझी एवढीच इच्छा आहे की – मानवाचे दुःख नाहीसे करण्याचे काम माझ्या हातून अखेरपर्यंत घडो.
..............उपनिषद.

मित्रांनो, आपल्या सर्वांना सस्नेह नमस्कार. ह्या वर्षीचे हे दुसरे बुलेटिन सादर करताना मला खूप आनंद होतोय त्याचे एक कारण म्हणजे १ जुलैच्या हिरव्यागार वृक्षारोपण कार्यक्रमानंतर झालेला दिमाखदार installatiion सोहळा. आणखी एक कारण म्हणजे जसा ग्रीष्माचा कडकपणा व मरगळ संपून निळसर आकाशातून थंड जलवर्षाव होतो तसेच या pandemic च्या कडक निर्बंधातून आपण सही-सलामत बाहेर पडल्याचा आनंद होतोय व सर्व काही पहिल्या सारखेच चालू झाल्याचे समाधान आहे. जुलैमध्ये झालेला रेनकोट वाटपाचा प्रोजेक्ट तर खूप भावला. रंगीबेरंगी रेनकोट घालून पावसात उभी असलेली लहान मुले अगदी फुलपाखरं दिसत होती.

ज्यांनी आपले लेख पाठविले आहेत त्या सर्वांना धन्यवाद. आपण सर्वांनी आपल्या ह्या बुलेटीन साठी लिहावे व त्यास वैविध्यपूर्ण होण्यास हातभार लावावा. कृपया लिहिते व्हा.

अगदी वर लिहिल्या प्रमाणे आपल्या सर्वांच्या हातून खूप मानवसेवा व्हावी ही शुभेच्छा व्यक्त करून थांबतो,

जयहिंद !

मित्रांनो, आपल्या Rotaty News magazine मधे आलेली एक अगदी सुंदर व समर्पक कविता इथे देत आहे.

**SERVE TO CHANGE LIVES**

The biggest gift we are given
Is the power to touch a life,

To change, to make a difference
In the circle of life.

If we can reach out
With our hand, heart and soul,

The magic will start to happen,
As the wheel begins to roll.

Let's turn the wheel together
So all humanity thrives,

We have the power and the magic,
To Serve to Change Lives.

प्रमोद गुगळे,
संपादक

# पावसाचे कवच

**सर्व्हिस प्रोजेक्ट**

आपला पावसाचे कवच हा आपला छोटेखानी प्रोजेक्ट २९जुले रोजी पूर्ण झाला. वेल्हा येथील तीन अतिदुर्गम गावांमधील शाळांमध्ये रेनकोट वाटपाचा प्रोजेक्ट. या गावांतील १२० मुलांना रेनकोट देण्याचा हा प्रोजेक्ट. या प्रोजेक्टला सहकार्य केल्याबद्दल प्रेसिडेंट विनायक पेठे व सर्व बोर्ड मेंबर्स ज्यांनी या प्रोजेक्टला तातडीने मान्यता दिली त्यांचे आभार. तसेच या प्रोजेक्ट करता ज्या मेंबर्सनी उत्स्फूर्तपणे मदत केली त्या ही सर्वांचे आभार. या प्रोजेक्ट साठी लागणारी २०,१००/- ही रक्कम अपील केल्यानंतर रेकॉर्ड ब्रेकिंग अशा १२ तासात जमा झाली. हा एक आपल्या क्लबचा खूप महत्वाचा पैलू. हा प्रोजेक्ट पार पाडण्यासाठी अवचित मारुती ट्रेकिंग ग्रुपची खूप मदत झाली. त्याचे ४ सदस्य आमच्या सोबत हजर होते.

आम्ही निव्ही आणि घीसर या गावांत पोहचू शकलो. रायदन वाडी येथे जाण्याचा पूल वाहून गेला होता. तेथील मुले बोटीने नदी क्रॉस करून घीसर या गावी आम्हाला भेटली. सर्व मुले बेहद्द खुश होती. खूप दिवसांनी शाळा चालू झाली म्हणून, मित्र मैत्रिणी भेटल्यामुळे आनंदात होतीच आणि टॉपिंग ऑन द केक आज मिळालेले रेनकोट. आज आम्ही अनुभवले तिथे छत्र्यांचे कामच नाही. कारण छोट्या मोठ्या डोंगर दऱ्यांचा प्रदेश असल्याने हवा खूप असते. तेथे छत्र्या टिकतच नाहीत. मुलांनी लगेच रेनकोट घातले सुद्धा आणि पावसात बागडायला लागली सुद्धा. त्यांना मजा करताना पाहिल्यावर श्रमाचे साफल्य झाल्याचे भासू लागले.



विशेषतः सुजाताताई आणि सुरेशजी नातू यांचे आभार! त्यांच्या सळसळत्या उत्साहामुळे आम्हाला प्रोत्साहन मिळाले, मिळत राहील. हा प्रोजेक्ट केदारने एक हाती पूर्ण केला असेच म्हणावे लागेल. रिक्वेस्ट त्याच्या मित्रांकडून आली अन त्याने fast action घेऊन एक आठवड्यात पूर्ण केला सुद्धा. रेनकोट डीलर शोधणे, त्या सोबत निगोशिएट करणे, रेनकोट घेऊन येणे, सर्व प्लॅन करणे हे सारे त्याचेच काम.

अशा दुर्गम ठिकाणी योग्य ती मदत, योग्य त्या वेळेत आणि गरजू विद्यार्थ्यांपर्यंत आपण पोहचवू शकलो याबद्दल प्रेसिडेंट विनायक, सर्व बोर्ड मेंबर्स, आणि सर्व रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज सदस्यांचे आभार

सर्वांचे खूप खूप धन्यवाद.

# दिमाखदार पदग्रहण समारंभ

दि. ३१ जुलै, २०२१ रोजी आपल्या क्लबच्या ७७व्या अध्यक्षांचे, दस्तुरखुद्द रो. विनायक पेठे (सरकार) आणि त्यांच्या बोर्डाचे पदग्रहण, अतिशय उत्साही वातावरणात, पुण्याई हॉल, कोथरूड येथे डी.जी. पंकज शहा यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. सुंदर सजलेले स्टेज, भरगच्च उपस्थिती, आपले एजी, एजीए, इतर डिस्ट्रिक्ट ऑफिसर्स यांची उपस्थिती अशा प्रसन्न वातावरणात मावळते अध्यक्ष रो. विनय नेवसे यांनी २०२१–२२च्या क्लब रोटरी अध्यक्षपदाची सूत्रे रो. विनायक पेठे यांच्याकडे सुपूर्त केली. तर मावळते सेक्रेटरी विवेक जोशी यांनी सेक्रेटरीशिपची सूत्रे रो. हर्षदा बावनकरकडे सुपूर्त केली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच आपल्या क्लबवर रो. केदारने तयार केलेली अतिशय सुंदर फिल्म दाखवली गेली. आपण आजपर्यंत केलेल्या भरीव कामगिरीचा यात आढावा तर आहेच, पण भविष्यात होऊ घातलेल्या समाजोपयोगी प्रकल्पांची माहिती प्रभावीपणे पेश केली आहे. आपण करत असलेल्या कामाची माहिती या फिल्मद्वारे सर्वदूरपर्यंत पोचणार आहे.

गतवर्षीचे अध्यक्ष रो. विनय नेवसे यांनी मागील वर्षाचा आढावा थोडक्यात सादर केला. कोव्हीड कारणाने सर्व प्रकारची बंधने असूनदेखील क्लबने सर्व आघाड्यांवर उत्तम कामगिरी केली आणि डिस्ट्रिक्टमध्ये दुसरा क्रमांक पटकावला. रो. विनयने सर्व क्लब बांधून ठेवला.

या समारंभाची खासियत म्हणजे, रोटरी क्लब मद्रास हेरिटेजचे अध्यक्ष रो.जी.व्ही. रमणा हे खास या समारंभासाठी उपस्थित राहिले. आपल्या क्लबने केलेल्या स्वागताने आणि पुणेरी पाहुण्याचे प्रतीक असलेली पगडी परिधान केल्यानंतर ते भारावून गेले. आपल्या क्लबसाठी त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आणि भविष्यात सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. नूतन वर्षाचे अध्यक्ष रो. विनायक पेठे यांनी वर्षाच्या सुरुवातीलाच मेजर डोनर म्हणून रोटरी फाऊंडेशनला १०हजार डॉलर्सची देणगी देऊन सर्वांनाच आश्चर्याचा सुखद धक्का दिला होता. येत्या वर्षात अनेक धडाकेबाज प्रोजेक्ट हाती घेऊन ते पूर्ण करण्याचा इरादा बोलून दाखवला. सरकार या वर्षी क्लबला नव्या उंचीवर नेऊन ठेवतील हे निश्चित!

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण डीजींचे भाषण! आपल्या छोटेखानी भाषणात त्यांनी आपल्या क्लबचे भरपूर कौतुक केले आणि या वर्षाच्या प्रोजेक्ट आणि वाटचालीबद्दल मार्गदर्शन केले.

सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अत्यंत सफाईदारपणे, ओघवत्या भाषेत रो.माधुरी मराठे आणि रो. शुभ्रो सेन यांनी केले आणि सर्वांची वाहवा मिळवली. तसेच रो. स्वाती कुलंदकर हिने सेक्रेटरी हर्षदा आणि नवीन होणाऱ्या सभासदांची व मानद सभासदांची ओळख करून दिली तसेच पी.पी.रो. राजीव बर्वे यांनी नेहमीच्या खुमासदार शैलीत प्रे. विनायकची ओळख करून दिली. पी.पी.दत्तात्रय जायदे यांनी डी.जी. पंकज शहा यांची ओळख करून दिली.

स्टेज डेकोरेशन, बक्षिस वितरण यांसाठी प्रतिभा, सुचिता, सोनाली चौबळ, स्वाती मुळ्ये या सर्वांनी अगदी मनापासून काम केले. पी.पी महेश ओझा यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीस २०–२१चे क्लब अॅवॉर्डस् जाहीर केले. प्रत्येक अॅवॉर्ड विनरच्या स्वागतासाठी केदारने उत्साही संगीतधून चालू ठेवून रंगत आणली. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन पुढील वर्षाच्या अध्यक्षा रो. स्वाती मुळ्ये यांनी केले. स्वादिष्ट अशा भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

–रो. दत्तात्रय



अब तुम्हारे हवाले ये 'क्लब' साथियों



### ऑगस्ट महिना वाढदिवस

| | |
|---|---|
| ३ ऑगस्ट | चारुता देवपालक |
| ६ ऑगस्ट | वरदा केळकर |
| ७ ऑगस्ट | मोहन जाधव |
| ७ ऑगस्ट | सुचित्रा शिंत्रे |
| १६ ऑगस्ट | योगेश नाईक |
| १८ ऑगस्ट | कोमल गोविलकर |
| २० ऑगस्ट | विनय नेवसे |
| २७ ऑगस्ट | मधुरा हुबलीकर |
| २८ ऑगस्ट | संजय कुलंदकर |
| ३१ ऑगस्ट | अभिजित बापट |



### सप्टेंबर महिना वाढदिवस

| | |
|---|---|
| ९ सप्टेंबर | सोनाली वैशंपायन |
| १४ सप्टेंबर | वैजयंती कुलकर्णी |
| १५ सप्टेंबर | मोहन चौबळ |
| १७ सप्टेंबर | नीता केळकर |
| २६ सप्टेंबर | विनय वाघ |
| २६ सप्टेंबर | सूर्यकांत वझे |
| २७ सप्टेंबर | प्रमोद गुगळे |

लग्न वाढदिवस

७ ऑगस्ट कार्तिकी आणि श्रीकांत सराफ

सप्टेंबरमध्ये लग्न वाढदिवस नाहीत.

# आपल्या सर्वांसाठी एक पर्वणी : महादान

प्रिय मित्र-मैत्रिणींनो,

आज आपल्याला, प्रामुख्याने जे गेल्या दोन वर्षात आपले नवीन सभासद झाले आहेत, त्यांच्यासाठी 'महादान' या आपल्या सिग्नेचर प्रोजेक्टविषयी माहिती देणार आहोत..

त्यापूर्वी, आपण रोटरीत का येतो? काय करतो आणि काय करायला पाहिजे याचा विचार करू. मला वाटतं, आपण रोटरीत येतो ते आपल्यापेक्षा वेगळ्या व चांगल्या विचारांची माणसं आपल्याला भेटतील, त्यांच्या विचारांनी आपल्याही ज्ञानाच्या कक्षा रुंदावतील, समाजाप्रती करण्याच्या अनेक गोष्टींची क्षितिजं आपल्याला कळतील. चार उत्तम मित्र-मैत्रिणी आपल्याला भेटतील आणि आपोआपच आपल्या वागण्यात, विचारांमध्ये एक प्रगल्भता येईल.

आपल्या क्लबचे नाव 'हेरिटेज' आहे. आणि 'दान' ही आपली संस्कृती आहे. हा दानाचा वारसा जपण्याचा प्रयत्न आपला क्लब २०१५ पासून आज अखेर 'महादान' या प्रकल्पातून करतोय. दिवसेंदिवस त्याचे रूप आणि व्याप्ती वाढत चालली आहे. या प्रकल्पातून आपण रक्तदानापासून धान्यदान, वस्त्रदान आणि आर्थिक दान या दानांच्या जाणीवा आणि महत्त्व समाजाला करून देतो, प्रत्येकाने आपला खारीचा वाटा गरजूंसाठी दिला पाहिजे याची जाणीव करून देतो.

प्रत्येक माणसाची समाजाप्रती असलेली आस्था, मदतीची जाण ही प्रत्येकाच्या मनात थोड्याफार प्रमाणात निर्माण करण्याचा हा एक छोटासा मार्ग!

पूर्वी 'महादान' आपण जुलैच्या पहिल्या आठवड्यात मातोश्रीमध्ये घेत होतो. तेव्हा नागरिक आपल्यापर्यंत येत होते. परंतु कोणतीही गोष्ट जर मोठ्या प्रमाणात करावयाची असेल, तर समाजमनाची गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे त्या कार्यात बदल करावे लागतात. कोरोनामुळे आलेली बंधने लक्षात घेऊन, ही आपल्याला मिळालेली नवीन संधी आहे आणि त्याचा फायदा करून घेतलाच पाहिजे, हे ओळखून गेल्यावर्षीपासून आपणच नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचलो. 'तुम्हाला अडचण आहेना? मग आम्ही आहोत ना. पण तुमची समाजाप्रती असलेली बांधिलकी या संकटकाळी विसरू नका.' असा संदेश आपण लोकांना दिला. त्यांनाही तो पटला. आणि लोकांनी भरभरून मदत केली. यातून मिळणारे धान्य, वस्त्र आपण योग्य त्या गरजूंपर्यंत पोहोचवू हा सार्थ विश्वास त्यांचा रोटरीवर आहे.

लोकांना देण्याची (दानाची) इच्छा असते, पण मार्ग माहित नसतो. ही इच्छा जाणूनच रोटरीने निरनिराळ्या प्रकल्पांची रचना केली आहे. प्रत्येक प्रकल्पात रोटरी हे प्रभावी माध्यम असते.

आपल्या क्लबच्या दृष्टीने विचार केला तर, स्वार्थाबरोबरच आपण परमार्थही साधत असतो. गरजू संस्थांपर्यंत मदत पोहोचवणे हा परमार्थ, पण रोटरी काय करते? कोणकोणते समाजोपयोगी कार्य क्लब करतो हे दूरपर्यंत पोहोचवण्याचे काम या प्रकल्पातून खूप मोठ्या प्रमाणात होते. रोटरी सारख्या १२५ वर्षे संपूर्ण जगात काम करणाऱ्या एकमेव संस्थेच्या समाजकार्यात तुम्हीही तुमचा खारीचा वाटा द्यावा हीच त्यामागची भावना असते. केवळ एवढाच स्वार्थ असतो.

मित्रांनो, या आपल्या महादानातून आणखी एक मोठी गोष्ट घडते. सर्व क्लब यामध्ये सहभागी होतो. आपल्याच सभासदांची आपल्याला एक वेगळी नवी ओळख होते. नवीन सभासदांची 'आता मी कसं बोलू?' ही भीड कमी होते. त्यालाही या प्रकल्पातील एखादी जबाबदारी घ्यावीशी वाटते. आपोआपच त्याची क्लबमधील ओढ वाढते, सहभाग वाढतो. आणि सुरुवातीला मी म्हटल्याप्रमाणे ज्या उद्देशाने आपण रोटरीत येतो, तो उद्देश सफल झाल्याचे एक आत्मिक समाधान आपल्याला या 'महादान' प्रकल्पातून मिळते. आणि 'याचसाठी केला होता जॉइन क्लब' असेही म्हणावेसे वाटते.

याहीवर्षी आपले नियोजन असेच असणार आहे. वेगवेगळ्या मोठ्या सोसायट्यांमधून आपण हा प्रकल्प राबवणार आहोत. जाण्यापूर्वी आपण त्या सोसायटीची परवानगी घेणार आहोत, त्यांना पूर्वकल्पना देणार आहोत. आणि आपल्या या समाजकार्याच्या यज्ञात त्यांच्या मदतीची आहुती मागणार आहोत.

रो. मधुमिता बर्वे
चेअरपर्सन
सिग्नेचर प्रोजेक्ट

रो. सचिन हनमघर
डायरेक्टर
सर्व्हिस प्रोजेक्ट

रो. आरती देवपाठक
चेअरपर्सन
नॉन मेडिकल प्रोजेक्ट

## श्रावण श्रावण

श्रावण श्रावण आला हा श्रावण श्रावण
सणासुदीचा श्रावण हर्षोल्हासी श्रावण

ऊनपावसाचा जुनाच खेळ
मनोमिलनाचा नवाच मेळ
मेघाच्छादित किरणांचे रंग
इंद्रधनुलवे मोहरते अंग
लहानथोरांच्या मना गुंज घाली श्रावण
श्रावण श्रावण....

पंचमी नगचग नरनारींची
रम्य मांडती पूजा ही नागाची
उत्साह दुणे सुवासिनींचा
खेळखेळता मंगळागौरीचा
घोरीबळीसवे सुंदर नटे हा श्रावण
श्रावण श्रावण...

प्रेमा निर्मळ माउबहिणीचा
नजनी बांधे धागा रक्षणाचा
दर्यावरी कोळी बांधवांच्या
उधाण मना मारळी पुनवेचा
उत्सवी उत्साही असे खोडीलही श्रावण
श्रावण श्रावण....

पुढे वेध गोपाळकाल्याचा
अन थरार गोविंदा पथकांचा
एकमेका करारे मदत अन
लक्ष आपले गाठारे पटकन
आनंदी रहा शिकवण देई हा श्रावण
श्रावण श्रावण...

छटा नारंगी क्षितिजा वरती
हिरवी मखमल धरे वरती
नटे नित्य ही स्वच्छ वसुंधरा
नेसून शालू सजे भरजरा
सौभाग्याचे लेणे देऊन नटवी श्रावण
श्रावण श्रावण आला हा श्रावण श्रावण
सणासुदीचा श्रावण हर्षोल्हासी श्रावण



सुमन
(उर्फ सचिन हनमघर)

## ऑगस्ट महिन्यातील साप्ताहिक कार्यक्रम

नमस्कार मंडळी, आपल्या या वर्षाच्या साप्ताहिक सभेतील पहिला कार्यक्रम १ जुलै रोजी झाला. वक्ते चारुदत्त आफळे यांच्या ओघवत्या वाणीतून आपण शिवरायांबद्दल परदेशस्थ विचारवंतांची काय मते आहेत, त्या काळातील परदेशी प्रवाशांनी शिवरायांबद्दल किती उत्तम नोंदी केल्या आहेत याबद्दल ऐकले.

१७ जुलै रोजी, डॉक्टर तुमच्या भेटीला या सदराखाली, मानसोपचारतज्ञ डॉ. मकरंद ठोंबरे यांची रो. लीना गोगटे यांनी अतिशय सुंदर मुलाखत घेतली. यात आपण भावनांचे व्यवस्थापन योग्य रीतीने करून आनंदी जीवन कसे जगायचे हे डॉक्टरांच्याकडून समजून घेतले.

२३ जुलै रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त दीपा बारटके, उदय पाळंदे, मीना पटवर्धन, संजय महाजन, धनश्री वैद्य यांच्याकडून त्यांच्या आयुष्यातील गुरूंविषयी जाणून घेतले. या कार्यक्रमाला अन्विताच्या प्रार्थनेने आणि अमेयाच्या नृत्याने चार चाँद लावले.

७ ऑगस्ट रोजी डॉक्टर तुमच्या भेटीला मध्ये आता आपले सभासद असलेले डॉ. श्रीधर चिपळूणकर यांच्याकडून पावलांची व्यथा आणि उपचार या कार्यक्रमाअंतर्गत घोटा,पाऊल, टाच या विषयींची दुखणी आणि घेण्याची काळजी याबद्दल जाणून घेतले.

१५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने ले. कर्नल मनोजकुमार सिन्हा यांचे अतिशय विचारप्रवर्तक असे व्याख्यान ऐकले. इतक्या कष्टाने मिळवलेल्या स्वातंत्र्याचा आपण योग्य तो आदर करत आहोत का? असा एक प्रश्न त्यांनी आपल्यासमोर मांडला. या कार्यक्रमात इतर ११ क्लब आपल्याबरोबर सहभागी होते.

रो. सुनीता ओगले
प्रोग्रॅम कमिटी चेअरपर्सन

**WORLD's Largest Rotary Club**

★ **RC Vijayawada Midtown As of 1.7.2020**
**RC Vijayawada Midtown, India**
**is the Largest Club in the World**
**with 722 Members**

**There are only three more Clubs in the World**
**with more than 500 Members:**
★ **RC Birmingham - 636**
★ **RC Oklahoma City - 568**
★ **RC Nashville - 538**
**all in the USA.**

## *WOMEN IN ROTARY*

*Until 1989, the Constitution and Bylaws of Rotary International stated that Rotary club membership was for males only.*

*In 1978 the Rotary Club of Duarte, California, invited three women to become members. The RI board withdrew the charter of that club for violation of the RI Constitution.*

*The club brought suit against RI claiming a violation of a state civil rights law which prevents discrimination of any form in business establishments or public accommodations. The appeals court and the California Supreme Court supported the Duarte position that Rotary could not remove the club's charter merely for inducting women into the club.*

*The United States Supreme Court upheld the California court indicating that Rotary clubs do have a "business purpose" and are in some ways public-type organizations. This action in 1987 allowed women to become Rotarians in any jurisdiction having similar "public accommodation" statutes.*

*The RI constitutional change was made at the 1989 Council on Legislation, with a vote to eliminate the "male only" provision for all of Rotary.*



## सप्टेंबर महिन्याचे कार्यक्रम

**३ सप्टेंबर – किस्से लग्न जमवण्याचे**
**४ सप्टेंबर – डॉक्टर तुमच्या भेटीला**
**१० सप्टेंबर– गणेशचतुर्थी निमित्त मीटिंग होणार नाही.**
**१७ सप्टेंबर– महादान तयारी**
**२४ सप्टेंबर– बिझनेस मीटिंग**

## कोरोनाच्या काळातील २४ तास घरांत...

लॉकडाऊन जाहीर झाले आणि २४ तास घरात हा कालावधी सुरु झाला. सगळे घरात असणार ह्या कल्पनेने मला जरा हायस वाटलं. रोजचे प्रत्येकाचे काट्यावरील वेळापत्रक सांभाळणे जरा अवघडच होत होते. सगळ्यांचे करता करता मीच स्वतः लॉक झाले होते. ह्यामुळे स्वतःला अनलॉक होता येईल असे वाटले आणि मी मनात स्वप्न रंगवू लागले. पण कसंच काय ? कामवाल्याबाईने फोन करून सांगितले, उद्यापासून मी कामाला येणार नाही. माझ्या डोळ्यापुढे माझे मी सोडलेले कुलूप परत लॉक झाल्याचे भासू लागले. कामं सगळी माझ्या भोवती फिरु लागली आणि तेव्हा कुठे मनात एकदा येऊन गेले कशाला हे लॉकडाऊन म्हणजे (२४ तास घरात) झालं! सगळे नुसते घरात. कामाला कोणाचीच मदत नाही. पण म्हणतात ना, इच्छा तिथे मार्ग मला एकएक वाट दिसू लागली. मिनू नाहीतरी म्हणतच होती, "आई तुला कामात मदत करावीशी वाटते. तुझं हे आमच्याकरिता दमणं दिसतं, पण माझ्या ऑफिसच्या कामातून मला वेळच मिळत नाही. आता मात्र माझं Work from home असल्यामुळे मी तुला थोडी तरी मदत करीन." ह्या तिच्या वाक्याने माझ्या मरगळलेल्या मनाला थोडीशी उभारी आली.

मिनूच्या कामाचा श्रीगणेशा झाला. असं लक्षात आलं की अरेच्चा, ही नुसतीच अभ्यासात हुशार नाही तर हिला स्वंयपाकात पण गती आहे. मग काय, आमचे मायलेकींचे रोजचे नवनवीन पदार्थ करून बघण्याचे कार्यक्रम सुरु झाले आणि घरचा चवीने खाणारा 'जज' अर्थातच मिनूचे बाबा ते कसं झालं आहे हे सांगायला तयार होतेच. मला ह्या स्वंयपाकघर नामक चौकटीतून हळूहळू का होईना सुटका मिळाली. 'हातासरशी आवरा' ही संकल्पना मिनूच्या डोक्यात भरवल्यामुळे ओट्यावर 'नो पसारा' दिसू लागला. मिस्टरांनी पण ह्या लॉकडाऊनच्या काळात घरातली कामे करण्याचा चंगच बांधला. सुरुवातीला जरा त्रास झाला मग मात्र अंगवळणी पडले..

खरंच ह्या कोरोना काळात मला माझ्या घरातील व्यक्तींचे मला न कळलेले गुण ओळखण्यास मदत झाली. दोघांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे आम्ही घरात एकत्र राहनही एकमेकांना अनोळखी आहोत असे वाटत होते. पण लॉकडाऊनचा चमत्कार म्हणजे चक्क आम्ही ज्या गोष्टी करू असं वाटलं नव्हतं, त्या करायला सुरुवात केली. पत्ते खेळणे, छान एकमेकांशी गप्पा मारणे, मिनू सुंदर गाते हे या काळातच समजलं. तसंच नवरा पण उत्तम कानसेन आहे हे कळलं.

आईला, बायकोला आपण किती गृहीत धरतो. त्यांच्या कामाला आपण हेतूपुरस्पर कमी लेखतो आणि हे लेखणे किती चुकीचे आहे हे जेव्हा स्वतः ते काम करु लागले तेव्हा कळले. एकंदर '२४ तास सर्वजण घरात' ह्या गोष्टीची सुरुवात कंटाळवाणी वाटली. पण कालांतराने तीच "तुझ्या गळा माझ्या गळा गुंफू मोत्यांच्या माळा" या संकल्पनेत बसू लागली.

लॉकडाऊने काय दिलं तर सुस, भरकटत चाललेली नाती पुन्हा एकदा घट्ट विणीत बांधली गेली. एकमेकांचा आदर करणे तसेच कुठलेही काम हे कमी प्रतीचे नाही हे शिकविले.

माणसाला भौतिक सुखाबरोबरच मानसिक आधाराची, भावनांची गरज असते. आहे त्या परिस्थितीत राहता आले पाहिजे. कमीत कमी गरजा ठेवून माणूस अतिशय समाधानी राहू शकतो हे ह्या '२४ तास घरात' या कल्पनेने शिकविले.

शेवटी मी असे म्हणेन प्रत्येक गोष्टीच्या २ बाजू असतात. २४ तास घरात असल्यामुळे बाहेर नोकरीसाठी जाणाऱ्या व्यक्ती शारिरीक व मानसिकदृष्ट्या खचल्या असतील पण त्याच बरोबर त्यांना घरातल्या माणसांची, त्यांच्या कामाची किंमत कळली. 'सहजीवन' म्हणजे काय तर आपले आयुष्य छोट्या छोट्या गोष्टीतून समृध्द होते तसेच दुसऱ्याकरिता आपली मते विचार बाजूला ठेवून, जर त्या प्रवाहात स्वतःला झोकून दिले तर मिळणारा आनंद हा वेगळाच असतो ते कळले.

"एकमेका साहय करु अवघे धरु सुपंथ" या सुविचाराचा प्रत्यय हा कोरोना काळात '२४ तास घरात' ह्या आयुष्यातील छोट्याशा कालावधीमुळे आला.

संयोगिता उदय पाळंदे

## अमेय पेठे यांचे क्लब अध्यक्ष म्हणून पदग्रहण

रोटरी ही संस्था जगभर पसरलेली आहे. पण या वर्षी एक न भूतो न भविष्यती अशी गोष्ट रोटरीत घडलेली आहे, आपल्या हेरिटेज क्लबची सूत्रे अध्यक्ष विनायक पेठे यांनी भारतात हाती घेतली त्याच वर्षी त्यांचे चिरंजीव रो. अमेय पेठे यांनी जगाच्या दुसऱ्या टोकावर असलेल्या अमेरिकेतील रोटरी क्लब ऑफ CoHleville, Weldon Springs, USA या क्लबची सूत्रे अध्यक्ष म्हणूनच स्वीकारली. दोन्ही क्लबचे लगाम आता दोन पेठे सरकारांकडे सुपूर्त आहेत. दोघांनाही या वर्षीच्या या अद्भुत वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा !





# बाली, देवांचे बेट









बाली हे पश्चिम इंडोनेशियामध्ये स्थित एक प्रसिद्ध इंडोनेशियन बेट आहे. सुंदर जंगलाचे आतील भाग आणि स्वच्छ तलाव ज्याचे भव्य किनारे विलोभनीय आहेत. सुंदर असे बाली खूप मनोरंजक आहे, त्याला कोरल ट्रँगल म्हणतात. हे सर्वात लोकप्रिय बेट आहे. बालीच्या प्रचंड लोकप्रियतेमुळे त्याच्या पर्यटन उद्योगाला चालना मिळाली. या ठिकाणचा पर्यटन उद्योग इतका महान आहे, की त्यातील ८०%अर्थव्यवस्था पर्यटनामुळे आहे! म्हणूनच उत्पन्नाच्या दृष्टीने पर्यटन हा बालीमधील सर्वात मोठा उद्योग आहे. इंडोनेशिया हा जगातील सर्वात मोठा मुस्लिम देश आहे, परंतु बालीमध्ये हिंदू बहुसंख्य लोकसंख्या आहे.

बालीमध्ये फक्त दोन ऋतू आहेत:- कोरडा हंगाम (एप्रिल ते ऑक्टोबर) आणि ओला हंगाम (ऑक्टोबर ते एप्रिल), परंतु एकूणच तापमान मध्यम राहते. बाली एक उष्णकटिबंधीय हवामान आहे म्हणून, बाली वर्षभर पर्यटनासाठी एक आदर्श ठिकाण आहे. पेये: जगातील सर्वात महाग कॉफी कोपी लुवाक ही बालीची खासियत आहे. बालीच्या उत्तरेस 'लोविना' आहे, जेथे विविध प्रकारचे डॉल्फिन आढळतात. सामान्यतः, पर्यटक कुटा, सेमीयाक आणि उबुडला भेट देतात. सेमियाक हे बाली मधील सर्वात लोकप्रिय पर्यटन शहर आहे. बाली मधील अधिक गोष्टी एक्सप्लोर करण्यासाठी आपण बालीला भेट देण्याची योजना आखत आहोत. साधारणतः ३२ ते ३५ हजारच्या जवळपास तेथील खर्च आणि विमान तिकीट + व्हिसा +Pandemic Precaution प्रोटोकॉल (Rtpcr test वैगरे असल्यास.) असा अंदाज आहे. ही सहल आपण फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात प्लॅन करत आहोत. गेल्या वेळच्या श्रीलंका सहलीच्या आठवणी ताज्या झाल्या ना. चला लागा तर मग तयारीला.....

# स्वागत नवीन सभासदांचे

## रो. शीतल अभ्यंकर व स्पा. अमित अभ्यंकर





गेल्या महिन्यात हेरिटेज क्लबच्या इन्स्टॉलेशनच्या दिवशीच शीतल अभ्यंकर हिचे इंडक्शन झाले. आणि ती रोटरी परिवारात सामील झाली. शीतल ही कॉसमॉस बँकमध्ये आय.टी. ऑफिसर म्हणून कार्यरत असून बँकेच्या हेड ऑफिसमध्ये तिचे काम चालते. कॉसमॉस बँकेत असणारी ती आपली तिसरी सदस्य आहे. तिला वाचन, संगीत आणि बॅडमिंटन खेळण्याची आवड आहे. तिचा स्पाऊस अमित याचा अजंठा मार्केटिंग हा व्यवसाय असून जाम्भी रोडवर मिठाईचे दुकान आहे. त्याला गिटार वाजवण्याचा छंद आहे तसेच टेबल टेनिसचीही आवड आहे. त्यांना अमित हा छोटा मुलगाही आहे.

यांच्याबद्दलची विशेष माहिती म्हणजे आपले प्रेसिडेंट विनायक यांच्या ज्येष्ठ भगिनींचे ते चिरंजीव व सून आहेत. हेरिटेज परिवारात त्यांचे मन:पूर्वक स्वागत.

## रो. शामप्रसाद पोंक्षे व स्पा. अश्विनी पोंक्षे





येत्या रविवारी २९ ऑगस्ट रोजी आपण नवीन व हरहुन्नरी शामप्रसाद पोंक्षे यांना रोटरीत सामावून घेणार आहोत. रो. वरदाच्या ओळखीने ते आलेले आहेत. मे. ओमॅक्स ऑटोज लि. या कंपनीमध्ये ते रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट या विभागात काम करतात. ही कंपनी हरयानामध्ये स्थित असून ते घरूनच ऑनलाईन काम करतात. ही कंपनी ऑटोमोबाईल्सची डेव्हलपमेंट करते. यापूर्वी त्यांनी टाटा मोटर्स, कायनेटिकसारख्या सुप्रसिद्ध कंपन्यांसाठी काम केले आहे. त्यांना रशियन भाषेची जाण असून बहासा ही इंडोनेशियाची भाषा व्यवसायासाठी आत्मसात केली आहे. त्यांच्या स्पा. अश्विनी या इंडिया मेट्रोलॉजिकल डिपार्टमेंट पुणे येथून निवृत्त झाल्या आहेत. गणित आणि स्टॅटिस्टिक्सची त्यांना विशेष आवड असून, चित्रकला, म्युरल पेंटिंग, क्रोशे वर्क या कलांमध्येही त्या रमतात. हेरिटेज परिवारात त्यांचे मन:पूर्वक स्वागत.

### ROTARY CLUB OF PUNE HERITAGE AWARD WINNERS OF 2020 -2021

| | | |
|---|---|---|
| 1 | Smiling Face | Swati Kunndkar |
| 2 | Most Active Lady | Supriya Jogdeo |
| 3 | Grand Fellowship | Sanyogita & Uday Palande |
| 4 | Best Attendance Spouse | Purvada Bapat |
| 5 | Best Attendance Rotarian | Sujata Natu |
| 6 | Best contribution by Non BOD Member | Mohan Chaubal |
| 7 | Best Proactive contribution | Sanjay Mahajan |
| 8 | Membership Development | Varada Kelkar |
| 9 | Best Committee | Membership Devlopment |
| 10 | Best Director | Jaywant Shintre |
| 11 | Best Support to President | Avinash Ogale |
| 12 | Best Spouse | Deepa Bartakke |
| 13 | Best Rotary Couple | Sachin & Suchita Hanamghar |
| 14 | Outstanding Project | Mahadan/Sainik Faral jointly |
| 15 | Best Rotarian | Harshada Bawankar |
| 16 | Service Above Self | Madhumita Barve |
| 17 | Outstanding Contribution for Founfation | Vinayak Pethe |
| 18 | Exceptional Contribution for Projects | Rajeev Barve |

### Citation List 20-21

1 Vinay Wagh For Lecture series on Mahabharat

2 Subhro Sen For Good Work in RYLA

3 Mohan Kakade For exceptional work in Teacher's Training

4 Supriya Jogdeo- ABC Group
Rajeev Barve
Sachin Hanamghar

5 Leena Gogate- Vishwa Marathi
Avinash Ogale

6 Sunita Ogale -Doctor Tumchya Bhatila
Madhumita Barve
Kedar Godbole

7 Dattaray Jayde -Chief Trustee

8 Sidharth Kunte Rotract President

